# रूपालीतला एक खेळ

बरोबर साडे-सातला जवळच्या ऑटो फॅक्टरीचा भोंगा वाजला आणि मी घरातून बाहेर पडलो.

"अरे दीपक, नाश्ता केलास का?" माझ्या म्हाताऱ्या आईचा मागून आवाज आला.

हे नेहमीचेच आहे. घरात नाश्ता काही नसतो आणि आईला बनवणे झेपत नाही. पण तरीही मी नाश्ता खाऊन निघावे अशी तिची रोजची इच्छा असते. मग गोड रव्याचे लाडू काय, तेलकट चिवडा काय, असल्या गोष्टी ती मला खायला सांगते. या काय नाश्ता म्हणून खायच्या वस्तू आहेत?

"रूपालीत खाईन काहीतरी, घाईत आहे!" असे आईला उत्तर देऊन मी स्कूटरला किक दिली.

मी रोज बाहेर खातो हे आईला पसंत नाही. पण त्याला माझा इलाज नाही. सकाळी उठल्यानंतर घराबाहेर पडणे हे एकच ध्येय माझ्या नजरेसमोर असते. बरोबर साडे-नऊ वाजता माझे मास्तरकीचे काम सुरू होते. फर्ग्युसनच्या पोरांना माझ्याकडून शिकण्यात रस असो वा नसो, मी मात्र प्रत्येक लेक्चरसाठी तयारी करतो, मूड बनवण्याचा प्रयत्न करतो. आणि त्यासाठी सकाळची वेळ माझ्या दृष्टीने मोलाची असते. ती वेळ घरात बसून खरकटे वास घेण्यात व दूधवाल्यापासून सुरू झालेल्या अखंड वर्दळीचे आवाज ऐकण्यात घालवणे माझ्या अतिशय जिवावर येते.

माझी टू व्हीलर पार्किंगमध्ये दोन सायकलींच्या मध्ये रूतवून मी रूपालीकडे चालू लागलो. सकाळची आठची वेळ असल्याने रस्त्यावरची वाहनांची रहदारी तुरळक होती. चालणारेच खूप होते. फर्ग्युसन रोडवरची कॉलेजची दुनिया अजून पूर्ण जागी व्हायची होती. रूपालीबाहेर खाकी कपड्यातला हडकुळा सिक्युरिटी गार्ड ऐटीत त्याची सैनीकी हॅट डोक्यावर ठेवून एकाच जागी गोल गोल फिरत उभा होता. त्याला एक्झॅक्टली काय काम असते हे मला कधीच उमगले नाही. तो फक्त ‘गाडी इथे लाव, तिथे लावू नको’ असे (तेही फक्त टू व्हीलरचालकांना) अधुनमधून सांगत असतो. त्याचे ऐकले नाही तर तो रागवत नाही, पण म्हणून तो ऐकवायला चुकत नाही.

"अहो साहेब, जरा सरळ लावा की. अजून एक गाडी बसेल तिथे," त्याने माझ्या दिशेने एक मौलिक संदेश फेकलाच. त्याच्या "अहो साहेब" या आदबशीर संबोधनाला "अरे गाढवा" या शब्दप्रयोगाचाच वास होता.

सुरूवातीला असे कुणी बोलले की माझा लगेच मूड-ऑफ व्हायचा. अपमान झाल्यासारखे वाटायचे. विशेषत: अशा दीड-दमडीच्या लोकांनी बोलले की. (अर्थात हा माझा ईगो होता. फर्ग्युसनमधला प्रोफेसर ना मी!) पण आपल्याकडे पब्लिक लाईफमध्ये कायमच काहीना काही कारणाने असे अपमान होत असतात. परवाच स्टेट बॅंकेत गेलो असतानाची गोष्ट. तिथल्या एका टेबलासमोर मी जाऊन उभा राहिलो व तिथल्या खुर्चीवर पसरलेल्या बाईंची मेहेरनजर केव्हा माझ्याकडे वळते याची वाट पाहू लागलो. तिथे रांग हा प्रकार नव्हताच. माझ्या मागून एक-दोघेजण आपापली कामे करून गेलीही आणि मी आपला बाईसाहेब कधी

प्रसन्न होतात याची वाट पाहात उभा. अचानक त्या बाई मुंगी चावावी तशा उठून उभ्या राहिल्या आणि मी त्यांच्या वाटेत आडवा उभा आहे हे दिसताच म्हणाल्या,

"काय हवे आहे?"

मग माझ्या उत्तराची वाट न पाहाता त्या म्हणाल्या, "थांबावे लागेल."

"का बरे?" साहजिकच मी विचारले.

"अहो, दिसत नाही का तुम्हाला? लंच टाईम आहे आमचा." बाई सात्विक संतापाने उद्गारल्या!

असे आपले पब्लिक लाईफ. माणूस कोडगा होईल नाही तर काय.

मी त्या सैनिकाच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करीत व माझा मूड सांभाळीत रूपालीकडे चालू लागलो.

घामेजलेले टी-शर्ट घालून चकाट्या पिटणारी एक-दोन कोंडाळीही तिथेच बाहेर घुटमळत उभी होती. रूपालीच्या एक-दोन किलोमीटरच्या त्रिज्येत राहाणारे नामांकित श्रीमंत लोक असे घाम गाळायला भल्या पहाटे कुठे-कुठे जाऊन बॅडमिंटन, टेनिस असे खेळ खेळतात, आणि मग रूपालीत येऊन इडली-सांबारात घुसतात. काही पोट सुटलेले, काही एकदम खेळाडूंसारखे फिट. त्यात बायकाही असतात. काही जण मर्सिडीस, होंडा मधून येतात, तर काही चक्क सायकलीवर आरूढ होऊन. या लोकांच्या गप्पांना अंत नसतो. इडली खाऊन पोटातली कावकाव जरा थांबली की यांची चिवचिव सुरू होते. ती कॉफी पीत, नंतर फुटपाथवर कोंडाळे करून, आणि शेवटी पार्किंगमधल्या गाड्या बाहेर काढतानाही चालूच असते. माणसाची सोशलाईझ करायची ऊर्मी किती जबरदस्त असते ते रूपालीत येऊन पाहावे.

मी रूपालीत शिरलो व बाहेरच्या ओपन-एअर जागेत टेबल रिकामे आहे का याची पाहणी केली. आणि अहो भाग्यम! एक जोडपे जस्ट उठून बाहेर चालले होते. मी पटकन जाऊन त्या टेबलाचा ताबा घेतला. रूपालीचा हा एरिया म्हणजे जणू विम्बल्डनचे सेंटर कोर्ट. इथे नंबर लावायला लोक सर्वात जास्त उत्सुक असतात. इथे झाडांच्या कुंड्या लावलेल्या आहेत. त्यांच्या मधून फर्ग्युसन रोड दिसतो व रोडवरची लोकांची ट्रॅफिक न्याहाळत बसता येते. झाडांमुळे धूर-धूळ यांचा त्रास होत नाही. पाऊस आला तर लगेच प्रत्येक टेबलावर इटालियन कॅफेंच्या बाहेर असते तशी छत्री लावली जाते.

माझे टेबल एका कोपऱ्यात असल्याने तिथून मला बाकी सगळी टेबले व कुठे-कुठे कोण-कोण बसले आहे ते व्यवस्थित दिसत होते. दिवसाची सुरूवात तरी बरी झाली होती.

"अरे दीपक तू? बरे झाले भेटलास!"

माझा एक मित्र आला व माझ्यासमोर बसला. हा मित्र केव्हातरी येतो. त्याला माझ्यासारखी रूपालीच्या ब्रेकफास्टची चटक लागलेली नाही. किंबहुना "इथली कॉफी मला आवडत नाही" असे म्हणणारा हा आख्ख्या पुण्यातला एकमेव असामी असावा.

मी इथे नेहमी पडीक असतो आणि बऱ्याचदा एकटाच असतो हे माहित असल्याने काम असले की चर्चा करायला तो मला इथे गाठतो. खरे म्हणजे रूपालीत एकमेकांचे बोलणे ऐकू येणे दुरापास्त व्हावे इतका इथे कायम गोंधळ असतो. त्यामुळे सर्वजण ओरडतच गप्पा मारत असतात. त्याने तो गोंगाट अजून वाढतो. पण सराईतांना याचा त्रास होत नाही; ते व्यवस्थित खाजगीत बसल्यासारखे निवांत बोलत असतात. मला असे कुणी भेटायला आले की मी फक्त श्रोत्याची भूमिका करतो व समोरच्याला आरडा-ओरडा करण्याची संधी देतो.

मित्राच्या बोलण्याला "हूं, हूं" करत मी इकडची तिकडची टेहळणी सुरू केली.

रूपालीत निम्मे लोक तरी नेहमीचेच होते. काही टोळकी, तर काही जोडपी, असे हे लोक न चुकता रूपालीत नियमित चर्चला किंवा देवळात गेल्यासारखे ठरलेल्या वेळी हजेरी लावतात. सगळयांच्या चेहऱ्यावर आनंद असतो, एक प्रकारचा रिलीफ असतो, जो सराईत असल्याशिवाय जाणवत नाही, उमजत नाही. "ज्येष्ठ नागरीक" या सदरात मोडतील अशा वयाचे काही लोक तर तुरूंगातून सुटल्याच्या आनंदात मोठ-मोठ्याने हसत, ओळखीच्या चेहऱ्यांना दुरून हात करत, एकमेकांना टाळ्या देत बसलेले असतात. दारूच्या अड्ड्यांवर किंवा "बार" मध्ये नियमित भेटणारेही असेच खुषीत असत असतील.

माझे असे काही टोळके मी बनवू शकलो नाही; किंवा माझे जोडपेही नाही. एकेका टेबलापाशी अशी छोटी-मोठी कोंडाळी बसलेली असताना मी असे एकटेच बसणे मला कधी कधी चमत्कारीकही वाटते. पण मला हे सर्व लोक ओळखतात, व न दिसणारे स्मित हसून तशी ओळख दाखवतातही. "हा कोण वेडा एकटा येऊन बसतो" अशी हेटाळणी करत नाहीत.

आम्ही बसल्यानंतर काही सेकंदांतच नखशिखांत पांढरा गणवेष घातलेला रूपालीचा एक वेटर आला व त्याने पाण्याचे ग्लास ठेवत "काय हवे" अशी ओठ न हलवता विचारणा केली. ‘योगी’ या स्टेजला पोचल्यावर माणूस कसा दिसतो हे पाहायचे असेल तर रूपालीतले हे काही वेटर पाहावेत. त्यांच्या चेहऱ्यावर कुठल्याही मानवी भावनेचा मागमूस नसतो; फक्त एक बुद्धाच्या चेहऱ्यावर दिसणारी करूणा दिसते. "बाळ, तुला काय खायला घालून तुझे दुःख मी दूर करू शकतो?" असा तो मूक प्रश्न असतो. मी एक-दोनदा स्मित हास्य देऊन जवळीक निर्माण करता येते का असा प्रयत्न करून पाहिला होता, पण त्याने त्यांचा तपोभंग काही होऊ शकला नाही.

या वेटरना गिऱ्हाईकाची चांगली जाण असते. ज्यांना पटकन काहीतरी घशात ढकलून जायची घाई असते त्यांना एकदम तातडीची सर्व्हिस मिळते. अन ज्यांना टाईमपास करायचा असतो, त्यांना ते अजिबात त्रास देत नाहीत.

मी इडलीवडा-चटणी सांगून त्याला रवाना केले व माझी टेहळणी सुरू केली. लोक येत होते, जात होते, डोसा-इडल्यांच्या प्लेट्स् इकडे-तिकडे फिरत होत्या, एकावेळी दहा-पंधरा कॉफीचे कप ठेवलेले ट्रे आकाशमार्गे भ्रमण करत होते. ओळखीचे लोक सोडल्यास - ज्यांच्यात मला अजिबात इंटरेस्ट नव्हता - इतर लोकांच्यात क्वचित (चुकून लवकर उठलेल्या) कॉलेज तरूण तरूणींचा घोळका होता; एक-दोन वयस्कर, एकमेकांशी (किंवा एकमेकांना) बोलून कंटाळलेली जोडपी होती. एक मैत्रीणींचे त्रिकूटही दिसले - ज्यात एकीने टेनिसचे शूज, वर पिवळा अर्धा भिजलेला टीशर्ट, आणि ‘आत्ता टरकते की मग’ अशी भीती वाटावी इतकी टाईट जीनची पँट घातली होती, एकीने सोज्वळ रंगाचा पंजाबी ड्रेस, तर एकीने चक्क साडी नेसली होती. मी थोडावेळ कुतुहलाने त्यांना न्याहाळले. त्या एकमेकीत इतक्या रममाण झाल्या होत्या की माझे सोडाच, इतर कुणाचेच अस्तित्व त्यांच्या खिजगणतीत नव्हते.

थोड्या वेळाने एक कपल माझ्या जवळच्या टेबलापाशी येऊन बसले. त्यातली स्त्रीपार्टी मला दिसायला ठीक वाटली. पण दोन-तीन कारणांनी तिचे आणि माझे जमणार नाही असे लगेचच मला कळून चुकले. एकतर आमच्यातले भौतिक अंतर खूपच कमी होते. इंग्लिशमधे म्हणतात तसे - too close for comfort. माझ्यासारख्या अजनबीविषयी काही स्नेह/जिव्हाळा निर्माण व्हायला एव्हढी जवळीक कामाची नव्हती. दुसरे म्हणजे तिच्या अंगबोलीत (body language) मध्ये काहीच उत्साह, आनंद दिसत नव्हता. कमालीचा बोअरडम तिच्या बसण्या-बोलण्यातून आणि न संकोचता दिलेल्या विक्राळ जांभयांतून दिसत होता. आता तिच्या या अवस्थेला कारण तिच्याबरोबरचा तो पुरूष होता की दुसरे काही ते देव जाणे!

आजचा नाश्ताही नुस्त्या इडलीवरच आटपावा लागणार असे वाटून मी सुस्कारा सोडला. अर्थात यात काही आश्चर्य वाटण्याचे कारण नव्हते. रूपालीचा चमचमीत नाश्ता खाता-खाता नवी कोरी (म्हणजे पूर्ण अनोळखी) आणि माझ्या पद्धतीची मैत्रीण भेटेल अशी अपेक्षा करणे हे म्हणजे माझ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी माझ्या क्लासमधे बसावे आणि टाळयाही वाजवाव्यात अशी अपेक्षा करण्याइतकेच अवाजवी होते.

माझी नजर समोरच्या वाफाळलेल्या इडलीकडे वळवत मी पुढे अजून काय वाढून ठेवले आहे असा विचार करू लागलो. आज बीए फर्स्ट ईयरच्या मुलांना सलग दोन तास इकॉनॉमिक्स शिकवायचे होते. काय शिकवायचे हे तसे आधीच ठरले होते. अमर्त्य सेनच्या सोशालिस्ट कॅपिटालिझमची ओळख करून द्यायची होती. नोबेल प्राईझ मिळाले असले तरी सेनची लिहिण्याची पाल्हाळिक पद्धत मला अतिशय कंटाळवाणी वाटायची. त्यामुळे मुलांना त्याचा प्रबंध रंजक करून कसा सांगता येईल ही विवंचना मला होती.

इडलीत फोर्क खुपसताना अचानक एक मंजूळ खेळकर आवाज कानावर पडला, म्हणून मी वर पाहिले. तर एक जोडपे माझ्या समोरच्या एका रिकाम्या टेबलाकडे चालत जाताना दिसले. एकंदर उंची, बांधा, व चाल हे पाहून ते दोघे मला माझ्या इंटरेस्टच्या वयोगटातले वाटल्याने मी इडली चावायचा थांबलो व मनोमन प्रार्थना करू लागलो की त्यांच्यातल्या स्त्रीपार्टीला माझ्या दिशेने ठेवलेल्या खुर्चीत बसण्याची बुद्धी व्हावी. आणि सुदैवाने तसेच झाले! बऱ्याचदा असे होते की धूर्त पुरूष पार्टनर त्यांच्या बायकांना जगाकडे पाठ

करून बसायला लावतात आणि मग आसपासचे पुरूष जग (ज्यात जास्ती करून माझ्यासारख्या पीडीतांचा समावेश होतो) दु:खी होऊन जाते.

तिचा चेहरा नजरेस पडताच मी अवाक झालो. अतिशय रेखीव काळेभोर चमकदार डोळे, नर्म सावळी कांती, आणि तिच्या मंजूळ आवाजाला शोभणारे प्रसन्न शुभ्र हास्य. तिचा बॉय-फ्रेंड (किंवा जे काही असेल ते, त्याच्याशी मला काहीच घेणे-देणे नव्हते) माझ्याकडे पाठ करून बसला होता व तिच्या नजरेच्या रेंजमध्ये समोर पण अंदाजे २०-३० अंश बाजूला असा मी होतो. तिचा रेखीव चेहरा पाहून मी तिचे नाव "रेखा" असे ठरवून टाकले. तर रेखाने बसल्या-बसल्या तिचे मस्तक मागे फेकले व तिचे भिरभिरणारे रेशमी केस दोन्ही हातांनी मागे घट्ट बांधले. स्त्रियांच्या अशा अगदी किरकोळ वाटणाऱ्या हालचालींतूनही जगात किती सौंदर्य व आनंद निर्माण होतो याची त्यांना स्वत:लाही कल्पना नसेल. तर, असे केस बांधता-बांधता रेखा तिच्या बॉय-फ्रेंडकडे अनिमिष नजरेने पाहात होती. आपण कुठे आलोय, आजुबाजूला कोण आहे याची तिला फिकीरच दिसत नव्हती. असे दृश्य दिसले की बहुतेक पुरूष नाउमेद होऊन त्या स्त्रीचा नाद सोडून देतात. पण मला हे शुभचिन्ह वाटले. रेखा तिच्या खाजगी जीवनात समाधानी असणे माझ्या दृष्टीने आवश्यक होते.

आता रेखामध्ये धाडसी वृत्ती (sense of adventure) आहे की नाही एव्हढेच पाहाणे बाकी होते.

माझी इडली नुकतीच सुरू झाली होती. ब्रेकफास्ट संपायला अजून मजबूत वेळ होता. माझ्या मित्राला माझ्या डोक्यात काय चालले आहे याचा अजिबात पत्ता नसल्याने त्याची वायफळ वटवट चालूच होती. आणि मी त्याच्या आवाजातल्या निव्वळ हेलकाव्यांचा मागोवा घेत कुठे "हो" म्हणायचे व कुठे "नाही" याचा अचूक अंदाज करीत होतो.

रेखाची तंद्री भंग करायला काहीतरी हालचाल करणे आवश्यक आहे हे ध्यानात आल्याने मी अचानक माझ्या मित्राच्या बोलण्यातला इंटरेस्ट एकदोन पटींनी वाढवला. त्याच्या जवळ जाऊन तो चावत असलेल्या डोश्याच्या घासांमधून निसटणारे काही शब्द पकडण्याचा प्रयत्न करून लागलो. एकदोन शब्द चक्क परत फेकून, मान जोराजोरात डोलवीत त्याच्या गप्पांत रस घेऊ लागलो. तोही जरा चक्रावला की, आपण असे काय बोलल्याने हा इसम एव्हढा एक्साईट झालाय!

पण ही युक्ती एकदम लागू पडली. माणसाच्या डोळ्यांत पेरिफेरल व्हीजन नावाचा प्रकार असतो जो फक्त हालचाल टिपतो. सगळे स्तब्ध असले की या व्हिजनला काहीच दिसत नाही. तशी रेखाच्या डोळ्यांनी बाजूला एकदम सुरू झालेली माझी हालचाल टिपली आणि तिने माझ्या दिशेने एक दृष्टीक्षेप फेकला. मी तयारच होतो. दोन इलेक्ट्रिक तारा जोडल्यावर व्हावे तसे आमचे "कनेक्शन" झाले! या कनेक्शनचे काय वर्णन करावे! "विजेचा सुखद धक्का" असा प्रकार अस्तित्वात नसल्याने ती उपमा देता येत नाही. पण खरे तसेच काहीतरी माझे झाले.

अर्थात रेखाला अशा नजरानजरीची सवय असणार. कारण तिच्यासारख्या अबव्ह अव्हरेज सुंदर असणाऱ्या स्त्रियांशी कनेक्शन व्हावे म्हणून कायमच पुरूष आपल्या नजरेच्या तारा घेऊन जागोजाग उभे असलेले

तिच्या पाहण्यात असणार. पण कसे कुणास ठाऊक, रेखाने काही सेकंदांनंतर पुन्हा एकदा माझ्याकडे नजर फेकली. आणि त्याही वेळी मी तिच्याकडे पाहात असल्याचे तिने हेरले. हा सर्वात क्रिटीकल क्षण होता. आता रेखाची प्रतिक्रिया काय होते याचा अंदाज करणे हे पूर्णपणे सर्वांच्या हाताबाहेरचे होते - तिच्याही. "हं! अजून एक बिचारा लाईन मारणारा वासू दिसतोय" अशा साधारण प्रतिक्रियेपासून ते "लंपट मेला, सकाळी सकाळी पण यांना दुसरे काही सुचत नाही" असा अतिरेकी विचार होण्याचीही अशा वेळी शक्यता असते. "अय्या, किती रूबाबदार आहे हा! आणि तरीही माझ्याकडे पाहातोय!" अशी बहुतेक पुरूषांना अपेक्षित असलेली प्रतिक्रिया मात्र खूपच असंभव. गंमत म्हणजे ही जी प्रतिक्रिया होते ती कुठून आणि कशी पैदा होते ह्याची केमिस्ट्री स्त्रियांना स्वत:लाही माहित नसते. असे हे दिव्य ज्ञान मला माझ्या मैत्रीणीने - विद्याने - पूर्वी केव्हातरी प्रदान केले होते, आणि तेव्हापासून मी बिनधास्त झालो होतो. एखाद्या गोष्टीला लॉजिक नसते असे कळले की चान्स घ्यायला माणूस मोकळा होतो!

अर्थात रेखाकडून माझी अपेक्षा खूपच निराळी होती. मी वासू, लंपट आदी सर्वसामान्य जमातींपेक्षा खूप वेगळ्या पंथातला होतो! पण हे रेखाच्या ध्यानात येते की नाही हे तपासून पाहाणे आवश्यक होते.

लहान मुले इतर अनोळखी मुलांशी जितक्या सहजतेने खेळायला तयार होतात, तेव्हढी मोठी माणसे होत नाहीत हे जगजाहीर आहे. लहान मुलांची एकमेकांशी एक नैसर्गिक वेव्हलेन्थ असते. त्यांना एकमेकांची नावेसुद्धा माहिती नसतात, तरीही "चल, खेळूया का" एव्हढीच प्रस्तावना करून ते क्रिकेट, फुटबॉल, किंवा लपंडाव असे खेळ खेळत असतात. आमच्या परिसरात बरेच इराणी लोक राहातात. त्यांची मुलेदेखील हिंदी-मराठीचा काहीही पत्ता नसताना इथल्या पोरांबरोबर खेळताना मी नेहमी पाहातो. अशी ही मुले खेळ संपला की 'बाय बाय' म्हणण्याची तसदीही घेताना दिसत नाहीत. सारांश मुलांना एकमेकाशी खेळ खेळायला जातपात-धर्म हे तर दूरचेच, साध्या ओळखीचीही गरज वाटत नाही.

असे स्पॉन्टेनियस खेळ आपण मोठे लोक का नाही खेळू शकत? वय वाढले की का कोण जाणे पण निरागसपणा व धाडसी वृत्ती कमजोर होतात. आणि भलत्या अपेक्षा निर्माण होऊन त्यांत अडकण्याचे भय वाटू लागते.

पण माझ्या सुदैवाने मी हेही पाहिले होते की (माझ्यासारखे) काहीजण अंगाने/वयाने वाढले तरी आपले बालपण जपून असतात व असे खेळ खेळायला उत्सुक असतात; नव्हे तयारच असतात. त्यांचे खेळांचे प्रकारही बदललेले असतात, किंबहुना ते अधिक रंजक झालेले असतात!

रेखाने असाच, लहान मुलांच्या सहजतेने, माझ्याशी थोडावेळ का होईना एक रंजक खेळ खेळावा अशी माझी इच्छा होती, ज्या खेळात फक्त नजरेचा वापर होतो! रेखाच्या नजरेत कमालीचे पोटेन्शल होते. वीज वाहायला जशा वेगवेगळ्या क्षमतेच्या तारा लागतात, तशी रेखाची नजर हाय व्होल्टेजच्या तयारीची होती. माझ्या आवडीचा हा खेळ खेळायला पार्टनर म्हणून रेखा एकदम फिट्ट होती.

आणि रेखाने माझ्याकडे तिसऱ्यांदा पाहिले! बस्स. माझ्या मनातल्या आशेचा अंकुर एकदम चायनीज बांबूसारखा फोफावला. आमचे कनेक्शन आता एस्टॅब्लिश झाल्यात जमा होते. रेखाने माझ्या "पोरखेळाच्या" संदेशाला प्राथमिक संमती दर्शवली होती.

माझ्या मित्राच्या गप्पांतला माझा इंटरेस्ट एकदम दस पटींनी वाढला. त्याला बिचाऱ्याला हे कळले नाही की प्रोफेसर दीपक आता त्याच्याशी नाही, रेखाशी गप्पा मारीत होते!

"किती दिवस वाट पाहायला लावलीस!" मी संभाषणाला सुरूवात केली. इथे ओळख वगैरे करून घेणे हा प्रकार नसतो.

"अं हो", रेखाने बिचकत उत्तर दिले. तिच्या नजरेत ('पाण्यात उडी टाकावी की नको' असा) साहजिक संभ्रम होता. बऱ्याचदा माणसाची पारख चुकू शकते याची रेखाला जाण होती.

"अगं हरकत नाही. माझीच चूक आहे. इकडे फिरकलोच नाही बरेच दिवस! मग कशी भेट होईल?" ('पाणी छान उबदार आहे, मार उडी' अशा सुरात) मी थाप ठोकत तिला प्रोत्साहन दिले व जमेल तितका प्रसन्न चेहरा केला.

एक-दोन मिनिटांच्या अशा मैत्रीपूर्ण सलामीनंतर मी रेखाचे मन वळवण्यात यशस्वी झालो. तिचे आक्रसलेले अंग छान मोकळे झाले व चेहरा मोगऱ्यासारखा फुलला. रेखाला प्रथमदर्शनीच माझ्याविषयी वाटलेला विश्वास आणि तिचा पूर्वीचा या खेळाचा अनुभव त्याला कारणीभूत होता यात शंका नाही.

मग रेखानेही सराईतासारखे माझ्याकडे कटाक्ष टाकत-टाकत तिच्या बॉय-फ्रेंडबरोबरच्या गप्पांचा पिच वाढवला. मध्येच मोकळे हसू, मध्येच डोलणारी मान, मध्येच भुवया आक्रसून दाखवलेली एखाद्या मुद्द्याबद्दलची शंका, अशा हावभावांतून आमचे संभाषण सुरू झाले. तिच्या बॉयफ्रेंडला व माझ्या मित्राला तीळभरही शंका येणार नाही अशा कौशल्याने आम्ही एकमेकांकडे नजरेचे बाण फेकत होतो, झेलत होतो. आता प्रत्येक बाण गुलाबाची, जाई-जुईची अशा अनेक सुगंधी फुलांची माळ घेऊन येत होता. आता विजेचे धक्के न येता एक सहज सततची विद्युतधारा आमच्यात वाहात होती.

"खरंच, किती दिवसांनी भेटतोयस!" रेखा तिच्या नजरेतून उद्गारली. (खरे पाहता या जन्मात तरी आम्ही प्रथमच भेटत होतो.)

"हो गं! काय करणार. कामच खूप वाढलेय," मी हसत उत्तरलो.

आमच्या संभाषणाबरोबर इडलीचा प्रत्येक घास आता अधिकाधिक मधुर आणि चवदार होत होता. रूपालीसारखी चटणी पुण्यात बाकी कुठेही मिळत नसावी. मी इडलीचा तुकडा अधिक आनंदाने तिच्यात

घोळवू लागलो. माझा मित्र मात्र डोश्याचे तुकडे कमालीच्या तटस्थतेने प्लेटमध्ये इकडे-तिकडे ढकलीत होता. त्याची मला कीव वाटली.

आम्ही खेळत असलेल्या या खेळाची गंमत अशी आहे की कुणीतरी प्रॉक्सी असल्याशिवाय मजा येत नाही. रेखा तिच्या बॉयफ्रेंडचा व मी माझ्या मित्राचा प्रॉक्सी म्हणून मनसोक्त वापर करत होतो. त्यामुळे तेही खूश आणि आम्हीही!

"तुला पाहून किती मस्त वाटतेय, खूप मिस करत होते तुला मी." रेखाने हनुवटीखाली बोटे रोवत आणि थोडेसे लाजत मला सांगितले.

"अगं मलाही. नाहीतर हे नुसते म्हाताऱ्यांच्या गप्पा ऐकत इडल्या खाणे किती बोअर आहे," मी रूंद हसत तिची शंका दूर केली.

"ही रूपाली किती मस्त जागा आहे नाही?" रेखाने उपम्याचा घास कोंबत म्हटले.

"प्रश्नच नाही. पण मी इथे येतो ते केवळ तुझी भेट होईल अशा आशेने," मी पुस्ती जोडत मेदूवडा चिरला.

यावर क्षणभर रेखाने डोळे वटारले.

"डोंट वरी. अशी अधुनमधुन भेटलीस तरी मला पुरे आहे," मी रेखाची समजूत काढली.

लगेचच न राहवून मी म्हटले: "ए, ती माझी आवडती action कर ना!"

रेखा खळखळून हसली व "हो नक्की" असे म्हणत तिने पुन्हा एकदा मस्तक घुसळीत दोन्ही हात मागे नेऊन तिचे केस बांधले.

अचानक मोठा गलका झाला म्हणून आम्ही पाहिले तर एक मोठ्ठा ग्रूप त्यांच्या गप्पा आटपून उठला होता. त्यांनी जवळपास तीन-चार टेबले एकत्र करून त्यांची छोटी सभाच भरवली होती. रूपालीचे वेटर अशा ग्रूपसाठी आपणहून टेबले लावून देतात, व त्यांना सर्वांना पहिली कॉफी लागते हे माहित असल्यामुळे लगेच मोठा ट्रे भरून कप आणि ग्लास त्यांच्या सेवेस हजर करतात. यातल्या काहींच्या विचित्र सवयी असतात. एखाद्याला एकदम कडक कॉफी लागते, तर एखाद्याला बिनसाखरेची. एक इसम माझ्या माहितीतला असा आहे की तो तीन ग्लास घेतो - एकात कडक कॉफी, एकात नुसते गरम पाणी, आणि एकात गार पाणी. मग चौथ्या रिकाम्या ग्लासमध्ये तो वेगवेगळी मिश्रणे करून तासभर पीत राहातो!

ही मंडळी गेल्यावर रूपाली एकदम धंदा बसलेल्या हॉटेलसारखी रिकामी दिसायली लागली. ही अजून एक रूपालीची गंमत आहे. मिनटा-मिनटाला चित्र बदलत असते. कधी एकदम हाऊसफुल तर कधी रिते-रिकामे.

मी माझी नजर इडली आणि रेखाकडे वळवली.

मध्येच रेखा काही अभद्र शंका आल्यासारखी माझ्याकडे पाहणे बंद करी, आणि माझा जीव व्याकूळ होई. पण परत तुरटी फिरवून पाणी स्वच्छ केल्यासारखे सद्विचाराचा प्रवेश होऊन तिचे मन स्वच्छ होई, व ती तिच्या बॉयफ्रेंडला आणि मला आळीपाळीने मंद स्मित देई.

जसे की एकदा मध्येच तिचा मित्र हात धुण्यासाठी उठला. तो चांगलाच हॅन्डसम व नीटनेटका वगैरे वाटला - कुरळे केस, मॉडर्न फ्रेमचा चष्मा, कुठलेही चित्र नसलेला खोचलेला गडद निळा शर्ट व खाकी रंगाची पँट. मला माझ्या एका कॉलेजच्या मित्राची पुसटशी आठवण झाली व मी त्याच्याकडे पाहात राहिलो. पण मी त्याच्या खिजगणतीतही नव्हतो. तो सरळ ताडताड नळापाशी गेल्यावर मी रेखाला विचारले, "हा कोण गं?"

लगेच रेखाने चेहरा पाडून माझ्याकडे दुर्लक्ष केले. तिचे बरोबरच होते. मी आमच्या खेळाचा एक नियम मोडला होता - कुठलाही खाजगी प्रश्न विचारायचा नाही!

मी "चुकले, माफ कर" असे एक-दोन मिनिटे पुटपुटत बसलो, तेव्हा कुठे रेखाने मला माफ केले. खेळाची कालमर्यादा इतकी अल्प असते की फार वेळ रागवून चालत नाही!

आमचा हा नजरबंदीचा खेळ तब्बल अर्धा तास चालला. डोळ्यांची ही भाषा वापरून आम्ही एव्हढ्या गप्पा मारल्या की त्या शुद्ध मराठीतदेखील मारणे अशक्य वाटावे. एकमेकांची विचारपूस केली, सुखदु:खाची चौकशी केली. भौतिक पातळीच्या पलीकडे जाऊन आमच्यातल्या नैसर्गिक धाग्याचा आत्मिक अनुभव घेतला. आमच्या या खेळात भविष्याचे कुठलेही आश्वासन नव्हते, आणि भूतकाळ निर्माण होण्याची भीतीही नव्हती.

एव्हढ्या वेळात रेखाने उपम्याखेरीज काहीच खाल्ले नसल्याचे माझ्या लक्षात आले. तिच्या समोरचा पुरूषच काहीबाही हाणत होता. माझ्या देखत त्याने आधी एक टोमॅटो आमलेट गडप केले व त्यावर एक रवा दोसा रिचवला. रेखा डाएटवर आहे की काय अशा विचाराने मला तिची काळजी वाटली. पण तिचे सौंदर्य संयमाच्या सात्विकतेने अधिकच तेज:पुंज झाल्यासारखे मला वाटले.

"तू काहीच नाही खाल्लेस गं. घे ना अजून काही तरी," मी व्याकूळ स्वरात तिची विनवणी केली.

"नाही रे. भूकच नाही एव्हढी. आणि तुला भेटल्यामुळे पोट भरले बघ." रेखा मिश्किलपणे उत्तरली.

मी माझ्या लाईट कॉफीचा पाचवा की सहावा घोट घेतला तेव्हा रेखा व तिचा मित्र उठले. खेळ संपल्याची शिटी झाली होती. आता कुठे आमच्या खेळाला रंग भरत होता, आणि एव्हढ्यात खेल खतम? मला निरतिशय वाईट वाटले; पण असे केव्हातरी होणार हे मला माहित होते. रेखाचाही चेहरा कष्टी झाला. तिला शेवटचे मी डोळे भरून निरखून घेतले. खुर्ची सरळ करताना तिनेही माझ्याकडे शेवटचा "गुडबायचा" कटाक्ष टाकला, व मग तिच्या हॅन्डसम बॉयफ्रेंडच्या हातात हात अडकवून ती अदृश्य झाली.

मीही बिल चुकते करून "आज ब्रेकफास्ट सुफळ संपूर्ण झाला" अशा समाधानात भरलेल्या पोटाने व अंत:करणाने माझ्या टू व्हीलरकडे चालता झालो. "गाडी इथे लावत जाऊ नका, पोलीस घेऊन जातील" हा सिक्युरिटी गार्डचा मैत्रीपूर्ण (!) सल्ला ऐकून मी नुसतीच मान डोलावली. माझ्या मित्राची शेवटची वाक्ये देखील मला ऐकू आली नाहीत, व तो कधी उठून गेला हे मला कळले नाही. पण वाचक हो, त्याला त्या अर्ध्या तासात काय रामायण झाले याचा अजिबात पत्ता लागला नाही याची खात्री बाळगा, कारण असा "पूर्ण" ब्रेकफास्ट करायची ही माझी पहिली वेळ नव्हती. आणि बहुधा रेखाचीही नाही!!

---oooo(((())))oooo---

शब्दांकन: अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com)

*Last updated: 18 May 2014*

<u>कथेमागची भूमिका</u>: रूपालीचे वर्णन बहुतांशी खरेच आहे. तसेच एकतर्फी "लाईन मारणे" हा प्रकारही सर्वपरिचित आहे. पण स्त्री-पुरूषांनी "भानगडी" करण्याच्या भानगडीत न पडता केवळ लहान मुलांसारखेच innocent खेळ खेळले तरी वैयक्तिक आणि सामाजिक ताण किती कमी होईल अशा कल्पनेतून उतरलेली ही परीकथा.